

# भारती विद्यापीठाचे
## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद - भारती

**A Monthly News Letter**

*** ऑगस्ट-२०१५ ***



**• HAPPY INDEPENDENCE DAY •**




Editorial Committee
Dr.D.G.Kanase - President
Dr.Santosh Mane - Editor -In-Cheif
Mr.Amol Vande - Exicutive Editor

An Initiative by Department Of Computer Science.



## प्राचार्यांच्या लेखणीतून

१६ सप्टेंबर २०१५ रोजी आपल्या महाविद्यालयास ३० वर्षे पूर्ण होत आहेत भारती विद्यापिठाची शैक्षणिक महासत्तेकडे सुरु असलेली वाटचाल आपणास ज्ञात आहे. भारती विद्यापीठाचे शिल्पकार आदरणीय डॉ.पतंगराव कदमसाहेब यांनी “गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन” हे ध्येय्य उराशी बाळगून १० मे १९६४ रोजी पुणे येथे भारती विद्यापीठाची स्थापना केली. शैक्षणिक कार्याबरोबरच समाजाच्या सर्वांगीण विकासात आपला सहभाग असावा या उद्देशाने भारती विद्यापीठ सहकार, साहित्य, सांस्कृतिक, कला व क्रीडा अशा अनेक क्षेत्रात भरीव योगदान देत आहे. दैदिप्यमान वारसा आणि उज्जवल भवितव्य असणाऱ्या भारती विद्यापीठाच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये खारीचा वाट उचलणारी डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली हि शाखा! कृष्णामाईच्या शांत, सुंदर आणि पवित्र किनाऱ्यावर वसल्येल्या सांगली शहरात पश्चिम महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उच्चाशिक्षानातील भारती विद्यापीठाचा पदार्पणाच्या प्रक्रियेतील आरंभ बिंदू म्हणून या महाविद्यालयाचा उल्लेख करणे अधिक औचित्यपूर्ण ठरेल. नवभारत शिक्षण मंडळाचे बंद झालेले शांतीनिकेतन महाविद्यालय पुन्हा सुरु करणे हा संस्थापक डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या धाडसी मनोवृत्तीचा व भविष्याचा वेध घेण्याचा असीम प्रज्ञेचाच एक प्रत्यय होता.

सर्व सहकारी प्राध्यापकांना शिक्षक दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा..!

**- प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे**

## युवकांनी विधायक विचारांची समृद्धी निर्माण करावी :डॉ.प्रशांत रसाळ

आयुष्यात पाहिलेली मोठी स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी युवकाच्यात तळमळ ,जिद्द त्याग व कष्ट करण्याची तयारी असावी लागते. याच गुणाचा महाविध्यालयीन जीवनामध्ये विकास होत असतो आपल्या समाजातील थोर महापुरुषाची चरित्रे,ग्रंथ,पुस्तक वाचून विद्यार्थीनी ज्ञानानं श्रीमंत बनण्यासाठी विधायक विचारांची समृद्धी निर्माण करावी असे प्रतिपादन सांगली मिरज कुपवाड. महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ .प्रशांत रसाळ यांनी केले

भा .वि .डॉ .पतंगराव कदम महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागाच्यावतीने आयोजित मागासवर्गीय विद्यार्थी,पालक मार्गदर्शन मेळाव्याच्या उदघाटनप्रसंगी प्रशांत रसाळ प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते .प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे अध्यक्ष होते तर डॉ.नामदेव कस्तुरे ,प्रा. एम .एच पाटील ,डॉ.बी.डी.पाटील,समाजकल्याण निरीक्षक सौ. मनिषा साळुंखे यांची उपस्थिती होती. आयुष्यात मोठे होऊन पैसे कमवण्यापेक्षा समाजसेवेला विद्यार्थी झोकून दिले पाहिजे.जीवनात अशक्य असे काही नाही इच्छाशक्तीच्या जोरावर यश प्राप्त करता येतें असे डॉ. रसाळ पुढे बोलताना म्हणाले यावेळी

डॉ. नामदेव कस्तुरे यांनी गरीब म्हणून जन्माला आलो पण गरीब म्हणून मरणार नाही या विषयावरती जोशपूर्ण असे व्याख्यान दिले.आयुष्यामध्ये श्रीमंत होणेसाठी छ. शिवाजी, म. फुले, सावित्री फुले, डॉ. आंबेडकर, डॉ. कलाम अशा थोर व्यक्तींची पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत कार्य संस्कृती, संस्कार उत्तम विचारासाठी घराघरामध्ये ग्रंथालय असावे. व आयुष्य उज्वल बनविण्यासाठी ग्रंथालयाशी मैत्री करून, युवकांनी कुटुंबासाठी, समाजासाठी, देशसाठी योगदान दिले पाहिजे असे डॉ. नामदेव कस्तुरे यांनी विविध दृष्टांत सौदाहरणासह उपस्थितांना मार्गदर्शन केले.

भारती विद्यापीठाचे
# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली
- NEWS LETTER -

August –2015 • संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभर सर्वत्र उपलब्ध • संवाद– भारती



Founder : Dr.Patangaro Kadam





## महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा




भारतीयांना अनमोल असणारा राष्ट्रीय सण १५ ऑगस्ट हा ६९ वा स्वातंत्र्यदिन वर्धापन सोहळा भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच.एम.कदम ,प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांच्या शुभहस्ते केक कापून साजरा करण्यात आला .

प्रारंभी ६९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त डॉ. एच.एम.कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे, डॉ.बी.डी .पाटील, प्रा.एम.एच.पाटील,प्रा.पद्माकर जगदाळे उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या प्रसंगी विविध गुणदर्शन कार्यक्रम साजरा केला. प्रा.प्रभा पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.स्मिता जगताप व प्रिया नगरकर यांनी केले. डॉ.संतोष माने यांनी आभार मानले. कार्याकमास सर्व प्राध्यापक व विध्यार्थी उपस्थित होते.




## सांगलीतील डॉ.पतंगराव कदम महाविदयालयात विद्यार्थ्यांचे स्वागत.


राष्ट्रीय मूल्यमापन व मुल्यांकन समिती बेंगलोरकडून ‘अ’ श्रेणीचे मानांकन प्राप्त असणाऱ्या येथील भारती विद्यापीठच्या डॉ.पतंगराव कदम महाविदयालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी प्रवेश घेतलेल्या बीएस्सीच्या प्रथम वर्ष विद्यार्थाचे प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांच्या अध्यक्षतेखाली विज्ञान विभागाकडून स्वागत करण्यात आले. विद्यार्थाचा प्रातिनिधिक स्वरुपात प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांच्याहस्ते रोपे देवून सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे म्हणाले, विद्यार्थी दशेतील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ.पतंगराव कदम अशा अनेक प्रकारच्या व्यक्तींनी समाजात आपली उत्तम प्रतिमा निर्माण केली आहे. अशा व्यक्तीमत्वातून विद्यार्थांनी प्रेरणा घेवून ज्ञानालाच देव मानावा. राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक सहल, नियतकालिक, ग्रंथालय, विज्ञान प्रदर्शन, स्पर्धा परीक्षा विभागाच्या विविध उपक्रमातून विद्यार्थांनी व्यक्तीमत्व उत्तम घडवावे, असे आवाहन डॉ. कणसे यांनी केले.


# उच्चशिक्षणाच्या गुणात्मक विकासासाठी पारदर्शी सर्वेक्षण गरजेचे : डॉ. डी. आर. मोरे

भारतामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात संख्यात्मक वाढ समाधानकारक झालेली आहे. मात्र जागतिक स्तरावरती उच्चशिक्षणाची गुणात्मक वाढ खूप चिंताजनक आहे. जोपर्यंत गुणात्मक वाढीतील नेमके अडथळे समजणार नाहीत. तोपर्यंत गुणात्मक वाढ गतिमान करता येणार नाही. यासाठी केंद्रातील सरकारने उच्च शिक्षणातील सर्वेक्षण करण्याचा कार्यक्रम आखला आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयातील प्राचार्य व नोडल अधिकाऱ्यांनी उच्चशिक्षणातील बदलाबाबत सक्रीय राहून गुणात्मक विकासासाठी पारदर्शी सर्वेक्षण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकासमंडळाचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्याल व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षण प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बी.सी.यु.डी.चे संचालक डॉ. डी. आर. मोरे बोलत होते. शिवाजी विद्यापीठ उपकुलसचिव एस. एल. कुबल, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, संशोधन सहाय्यक अतुल भगणे, सांख्यिकी अधिकारी अभिजीत रेडेकर यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. जी कणसे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, डॉ. संतोष माने, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांच्यासहित महाविद्यालयातील प्राध्यापक, नोडल अधिकारी शशिकांत वायदंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सौ. प्रभा पाटील यांनी, तर प्रा. बी. डी. पाटील यांनी आभार मानले.






आपल्या सर्वांचा आवडता गणेशोत्सव आलेला आहे. सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा.


# डॉ.अब्दुल कलामांचे विचार युवकांची अखंडित ऊर्जा आहे : सौ विजयमाला कदम.

संपूर्ण देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वताची आगळी वेगळी प्रतिमा निर्माण करणारे भारताचे माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम सर्वानाच युगप्रवर्तक असे होते. एक निष्णात शास्त्रज्ञ, श्रद्धाळू माणूस व तरुणाईमध्ये देशाचे भविष्य शोधणारे डॉ. कलाम यांचे विचार ही आजच्या पिढीतील युवकांसाठी अखंडित अशी सकारात्मक उर्जा आहे, असे प्रतिपादन भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा सौ .विजयमाला कदम यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित ' युवकांची प्रेरणा डॉ. अब्दुल कलाम ' या भित्तीपत्रकाचा उद्घाटन सोहळ्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ.विजयमाला कदम बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे होते.



सौ.कदम पुढे म्हणाल्या ,वैज्ञानिक ,संशोधन आणि व्यासंगी व्यक्तिमत्व म्हणून डॉ.कलाम यांची कामगिरी उत्तुंग स्वरुपाची आहे. संपूर्ण देशाला नव्या उंचीवर नेवून ठेवणारे डॉ.कलाम संपूर्ण देशातील अनमोल देणं आहेत. त्यांचा खडतर प्रवास हा एक तेजस्वी प्रकाशमय व चिरंतन असणारी आदर्श जीवन यात्रा आहे. आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी पेरलेल्या स्वप्नांची बीजे उरात जपून विद्यार्थ्यांनी विद्याव्यासंगी बनून बलशाली राष्ट्र घडवण्यासाठी अहोरात्र कार्य करावे. महाविद्यालयात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना गुणांबरोबर प्रत्येक्ष ज्ञानामध्ये भर पडण्यासाठी कौशल्यपूर्ण अशा नाविन्यपूर्ण उपक्रमाची भूमिका महत्वाची असते असेही त्या म्हणाल्या. डॉ. कणसे म्हणाले डॉ.अब्दुल कलाम हे सर्वांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते .त्यांचे स्वप्न पूर्ण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे .भौतिकशास्त्र विभागातील डॉ.सी.ई.पाटील, डॉ.संतोष माने, यांच्या मार्गदर्शनाखाली बी.एस्सी भाग ३ व २ च्या विद्यार्थ्यांनी हे भित्तीपत्रक तयार केले होते. यामध्ये डॉ.अब्दुल कलाम यांचे समग्र जीवन परिपाठ, त्यांचे कार्य ,संशोधन ,अनमोल विचार ,छायाचित्रांचा समावेश आहे. यावेळी प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे ,डॉ.बी.डी.पाटील, प्रा.एम.एच.पाटील, डॉ.संतोष माने, डॉ.सी.ई.पाटील, प्रा.श्रीकृष्ण मोहिते ,वसंत पाटील ,अशोक लोहार यांच्यासह अनेक विध्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.











मा.सौ.वहिनीसाहेब भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना ....



कै.श्रीपतीराव कदम यांना अभिवादन करताना महाविद्यालयातील प्राध्यापक ..



मायक्रोबायोलोजी विभागाच्या पोस्टर प्रदर्शन प्रसंगी मा.प्राचार्य व इतर प्राध्यापक




B.Sc. च्या विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रम प्रसंगी मा.प्राचार्य व इतर



मान्यवरांच्या महाविद्यालय भेटीप्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



महाविद्यालयात स्वच्छता मोहिमे प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर

# यशस्वी होण्यासाठी श्रमाची प्रतिष्ठा जोपासा - डॉ.डी.जी.कणसे.

ज्या व्यक्तींनी जीवनात कष्ट केले आहेत, अशाच व्यक्ती यशाच्या शिखरावर विराजमान आहेत. महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थ्यांना श्रमाची शिकवण राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी श्रमाची प्रतिष्ठा जोपासावी, असे प्रतिपादन डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले. ते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.

डॉ. कणसे व उपस्थितांच्या हस्ते रोपास पाणी घालून राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.टी.आर.सावंत यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय व उद्दिष्ट सांगितले. यावेळी सांगली जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाचे कार्यक्रम अधिकारी विवेक सावंत, पर्यवेक्षक प्रा.प्रमोद संकपाळ, समुपदेशक प्रा.रुपाली सूर्यवंशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना एड्स समज-गैरसमज याविषयी चित्रफितीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.बी.डी.पाटील, प्रा.एम्.एच्.पाटील, डॉ.सी.ई.पाटील, प्रा.डॉ.जया कुर्हेकर, प्रा.ए .एन.मोरे, प्रा.प्रदीप डीकुळे, प्रा.उज्वला देसाई यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता केली.

# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात डॉ.एस्.आर.रंगनाथन जयंती

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालय शास्त्राचे जनक आदरणीय पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांच्या हस्ते डॉ.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. प्राचार्य म्हणाले, आजच्या संगणक युगात युवा पिढीत पुस्तक वाचनाविषयी उदासीनता दिसून येते. ज्ञानाने श्रीमंत होण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगल्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे २०२० साली देश महासत्ता होण्याचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी युवा पिढीची पाऊले ग्रंथालयाकडे वळतील तेव्हा खऱ्या अर्थाने देश महासत्ता होईल. त्यासाठी ग्रंथालयातील पारंपरिक वाचन साहित्याबरोबरच ई-बुक व ई-जर्नल्स चा वापर करावा असे प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ग्रंथपाल सौ.जे.डी.हाटकर यांनी डॉ.रंगनाथन यांच्या कार्याचा आढावा दिला.

कार्यक्रमास डॉ.बी.डी.पाटील, डॉ.एम.एच.पाटील, प्रा.श्रीकृष्ण मोहिते, संजय ठिगळे यांचेसह सर्व प्राध्यापक वर्ग, ग्रंथालय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यकामाचे सुत्रसंचालन प्रा.सौ.प्रभा पाटील यांनी केले.



## शिक्षक आपल्याला भरभरून देतात कितीतरी प्रकट भूमिकांमधून !

ज्ञानप्रसारक, सहशोधक, प्रशिक्षक, कृतीदर्शक...
कौशल्यदाता, संस्कारदाता, स्फूर्तीदाता....
समुपदेशक, उपदेशक, प्रबोधक, मूल्यसंवर्धक,
मार्गदर्शक, मित्र, आधारस्तंभ.....

## आपले शिक्षक नेहमीच कार्यरत असतात अप्रगट कितीतरी भूमिकांमधूनही !

आजन्म अभ्यासक, संशोधक, अभ्याससाहित्य लेखक,
परीक्षक, मूल्यमापक, गुणवत्ता समीक्षक....
अभ्यासक्रम नियोजक, व्यवस्थापक, संघटक...

समाज उन्नती साठी सतत कार्यरत राहुन युवापिढीतून ज्ञानाधीष्टीत
समाज घडवून देशाच्या सर्वांगीण विकासात बहुमोल योगदान देणाऱ्या सर्व शिक्षक वर्गास

## ५ सप्टेंबर

# शिक्षक दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

## Student Reporters:

1.Mr.Desai Shubham B.
2.Pujari Keshav N.
3. Patil Nilam R.
4.Khot Sayali B.
5. Kaware Bhushan B..
6.Hirugade Manoj S.

**|| आवाहन ||**

सर्व शिक्षक व विद्यार्थांना सदर "संवाद -भारती " न्यूज लेटर मध्ये आपले किंवा आपल्या विभागाचे साहित्य ,लेख , प्रकाशित करण्यासाठी dpkm.newsletter@gmail.com या ई-मेल वर साहित्य पाठवावे .

प्रती ______________________________
______________________________

• Sanvad-Bharati : Monthly News Letter •
(For Private Circulation Only)
Dr.Patangrao Kadam Mahavidyalaya,Sangli
dpkm.newsletter@gmail.com
dpkmsangli.bharatividyapeeth.edu